# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | MARCH 2024 | No. 02


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र ३१:१७-२४

१७. हे परमेश्वरा, मला लज्जित होऊ देऊं नको; कारण मी तुझा धावा केला आहे; दुर्जन लज्जित होवोत, ते अधोलोकांत नि:शब्द राहोत.

१८. धार्मिका विरुद्ध गर्वानें; तिरस्काराने व उद्दामपणाने बोलणाऱ्यांची वाचा बंद पडो.

१९. तुझे चांगुलपण किती थोर आहे! तुझे भय धरणाऱ्यांकरिता तुं, ते साठवून ठेविले आहे, तुझा आश्रय करणाऱ्यांसाठी मनुष्यमात्रांदेखत तूं ते सिद्ध केले आहे.

२०. तुं आपल्या समक्षतेच्या गुप्त स्थळी मनुष्यांच्या कलहापासून त्यांस लपवितोस; शब्द कलहापासून त्यास आपल्या मंडपात रक्षितोस.

२१. परमेश्वर धन्यवादित असो; त्याने मला तटबंदीच्या शहरांत ठेवून आपल्या वास्तलयाचें कौतुक दाखविले आहे.

२२. मी तर अधीर होऊन म्हणालो, मी तुझ्या दृष्टीपुढून दूर झालो आहे; तरी मी तुझा धावा केला तेव्हां तुं माझ्या विनवणीचा शब्द ऐकला.

२३. अहो परमेश्वराचे सर्व भक्तहो; तुम्ही त्याजवर प्रेम करा; परमेश्वर सत्यशीलांचें रक्षण करितो; गर्विष्ठाचें पुरे पारिपत्य करितो.

२४. अहो परमेश्वराची आशा धरणारे तुम्ही सर्व हिम्मत बांधा, तुमचे मन धीर धरो.

# देवाच्या निश्चततेसह अनिश्चित समय!

*मानद प्रमुख संपादिका : रेव्ह ॲन्जेलीन सेल्वाकुमारी*



अद्भूत कृत्ये करणारा तूंच देव आहेस; तूं आपले सामर्थ्य लोकांत प्रगट केले आहे. (स्तोत्र ७७:१४)

येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा!

परत एकवार या लेखाद्वारे तुम्हा सर्वांशी संपर्क साधण्यात आनंद होत आहे. २०२४ या वर्षाचे दोन महिने आता संपले आहे. दिवस अतिशय जलद गतीने धांवत आहेस! स्तोत्र ७७ जाहिर करीत आहे, की ज्या देवावर आपण विश्वास ठेवित आहोंत, तो अद्भूत कृत्ये करणारा आहे, आणि त्याच्या लोकांमध्ये त्याचे सामर्थ्य प्रगट करण्यात त्याला आनंद वाटतो. त्याला आपल्या प्रवासातील त्याच्यावरील दृढ भरोशाबद्दल आनंद होतो आणि अशक्य ते करण्यास तो उत्सुक असतो.

आपला जीवन प्रवास असंख्य अनअपेक्षित अशा वेड्या-वाकड्या वळणांनी, खाच खळग्यांनी, अदृष्य न दिसणाऱ्या जागांनी व्याप्त आहे. त्यामुळे जीवन अनिश्चितेने भरलेले वाटते. या अनोळखी, सतत बदलणाऱ्या मार्गाने जात असताना अनेक विशिष्ट प्रकारांची आवाहने असतात.

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता   रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**HON. EDITOR-IN-CHIEF**

Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

**MANAGING EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**GENERAL MANAGER**

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

**ADMINISTRATION**

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

**EDITORIAL BOARD**

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

**E.MAIL**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


**''परमेश्वर देव, इस्राएलाचा देव, तोच काय तो अद्भूत कृत्यें करितो; त्याचा धन्यवाद होवो.''**
**(स्तोत्र ७२:१८)**

प्रभुमधील अति प्रियांनो,

आम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात शुभेच्छा व्यक्त करित आहोत.

मागील काहि महिन्यात प्रभु परमेश्वराने आमच्या सेवाकार्यात आश्चर्यकारकरित्या आमचे मार्गदर्शन केले आहे. आमच्या यूट्युब चॅनलच्या आणि मासिकाच्या माध्यमाद्वारे प्रभुने त्याच्या पासून दूर असलेल्या अनेकांची भेट घेतली आहे. देवाने ३१ डिसेंबर २०२३ची मध्यरात्रीची



*मध्य रात्रीची नवीन वर्षाची उपासना*


नवीन वर्षाची उपासना आशीर्वादीत केली.

**'नहेम्या बायबल कॉलेज'**मध्ये शिक्षण घेतलेले पास्टर पी. आरोकियदास हे सध्या वलसारवाक्कम येथे आहेत. त्यांनी आमच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात येऊन त्यांची अत्यंत प्रबळ अशी साक्ष दिली. त्यांनी त्या ठीकाणी नवीन सेवा सुरु केली आहे.



*पास्टर पी. आरोकियदास वरिष्ठ पास्टर सोबत*

छत्तीसगढ राज्यातून बंधु सुरेश तीरगे यांनी त्यांचा मुलगा अविनाश आणि नातेवाईकांसहित आमच्या मुख्य मंडळीला भेट दिली. **एको ऑफ हिज कॉल**



*बंधु सुरेश तीरगे आणि त्यांचा मुलगा अविनाश, वरिष्ठ पास्टर सोबत*

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ◘ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ◘ YouTube Ministry ◘ Online Courses ◘ Theological Correspondence Courses (2 languages) ◘ Church Planting ◘ Nehemiah Bible Colleges ◘ Gospel Printing Press ◘ Great Commission Partners ◘ St. Paul's Matriculation School ◘ Crusades ◘ Community Development

मासिकाच्या वाचनाद्वारे त्यांना मिळालेल्या आशीर्वादाबद्दल त्यांनी देवाचे गौरव केले.

आमच्या मुख्य मंडळीच्या बहुविविध कार्यात आघाडीवर कार्यकरणाऱ्या आमच्या देवाच्या सेवकांकरिता प्रार्थना करा.



*महाबलीपूरम येथील एक दिवसीय शिबीर*

२६.०१.२०२४ रोजी महाबलीपूरम येथे घेण्यात आलेले एक दिवसीय शिबीर देवाने आशीर्वादीत केले. शिबीरात आमच्या मुख्य मंडळीतील तरुण आणि **नहेम्या बायबल कॉलेज**चे विद्यार्थी मिळून एकूण ६० जण सहभागी झाले होते.

वकील धर्मराज, पास्टर फ्रॅंकलीन आणि पास्टर देवदास यांनी काही दिवसांपूर्वी उत्तर भारतात सेवा करण्याची जबाबदारी स्विकारिली. देवाने आम्हाला उत्तर प्रदेशातून स्थलांतरीत झालेल्या कामगारांना सुवार्ता गाजविता यावी यासाठक्ष व **निवासी नहेम्या बायबल हिन्दी कॉलेज** करिता दिर्घकालीन योजना आखण्यास मदत केली.



कृपया **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व सेवाकार्या करिता व सेवकां करिता प्रार्थना करा. देवाची कृपा तुम्हा सर्वांसह राहो. आमेन.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज आणि**
**ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 9841271858/9841071858

E-mail : sam@echoofhiscall.org

## Kind Attention: Echo of His Call Readers

Our 5 minute **Echo of His Call** YouTube messages are being broadcasted from 2.00 A.M. in Tamil, Telugu, English and Hindi (everyday). You can receive the Grace of God by watching the messages.

Moreover, save my mobile numbers (+91) 98410 71858, (+91) 98412 71858 (personal) in your mobile phones.

- Pr. S. Sam Selva Raj

(पान १ वरुन...)

मी वाहन चालवित असते; तेव्हा सर्वस्वी मार्गदर्शक नकाशावर अवलंबून असते. यासाठी की मी माझ्या इच्छित स्थळी न चुकता पोहंचावे, आणि महत्त्वाचे म्हणजे पुढील रस्ता कशाप्रकारचा आहे हे समजावे. मी डोंगराळ प्रदेशात राहत असल्यामुळे मला पुष्कळशा चढ-उतारांना सामोरे जावे लागते. गुगल ॲप नकाशाची मला सुरक्षित प्रवासाकरीता आणि पुढील रस्ता कसा आहे हे पहाण्यास मदत होते. उदा. वळणे अपेक्षित धरुन आणि वळणावर दुसऱ्या वहानाच्या पुढे जाण्या ऐवजी सरळ रस्त्यावर वहानाच्या पुढे जाण्यासाठी धोक्याच्या जागी वाहनाचा वेग कमी करुन अनोळखी रस्त्यावरुन सावधतेने पुढे जाऊ शकते. जी.पी.एफ, मुळे अनिश्चित अशा रस्त्यावरुन प्रवास करण्यास मी तयार होते. बहुतेकदा, जीवन देखील जी.पी.एफ. सहित असावे असे मला वाटते! त्यामुळे जीवनाचा शेवट सुरुवातीसच पहावयास मिळू शकतो.

कोणतीहि गोष्ट सुरु करण्या अगोदर मला त्याचा शेवट जाणून घ्यावेसे वाटते. तुमच्याबद्दल मला माहित नाही. कोठे जात आहे. याची कल्पना नसताना मला काम करणे कठीण जाते. काम करण्यास सुरुवात

**Statement about ownership and other particulars about the Newspaper Echo of His Call (Marathi) - Form IV (See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | **New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai - 600 005.** |
| 2. Periodicity | : | **Monthly** |
| 3. Printer, Editor, Owner & Publisher | : | **S. Sam Selva Raj** (Same Address) |
| 4. Nationality | : | **Indian** |

I, **S. Sam Selva Raj** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**March 2024** **S. Sam Selva Raj.**

करण्या अगोदर परिणामाविषयी विचारणा करण्याकडे आणि नंतर कामास सुरुवात करण्याकडे माझा कल असतो. परंतु जीवन तशा प्रकारे कार्य करीत नसते. ते अपेक्षा नसलेली अनपेक्षित आवाहने आपल्यापुढे आणते. अचानक प्रियजनास गमावणे, नोकरीत बदल, आर्थिक अडचणी, किंवा नातेसंबंधात अनपेक्षित वादळ, अशी काही उदाहरणे ज्यांची आपण कधीही कल्पना देखील करणार नाही.

अशा अनिश्चितता कशा हाताळाव्या? मला एक जोडपे आठवते, ज्यांचा २७ वर्षापूर्वी विवाह झाला होता, आणि त्यांना ३ सुंदर लेकरे होती, आणि त्यांची अतिशय संमजस व काळजी घेणारे जोडपे अशी ओळख होती. अचानक, माझ्या ऐकण्यात धक्कादायक अशी बातमी आली की ते घटस्फोटाच्या मार्गावर आहेत. पत्नीला त्याबाबत विचारले असताना ती म्हणाली, ''ते अगदी अपेक्षित नसताना घडले. माझ्या जीवनात असे काही घडेल असा विचार देखील कधी आला नाही.''

ते अतिशय कठीण आणि वेदनादायक आहे; तरी सत्य बदलत नाही. अशा सर्व परिस्थितींमध्ये, एक गोष्ट निश्चित असते. देव विश्वसनिय आहे.

बायबल स्तोत्र ७७:१४ मध्ये म्हणते, **''अद्भूत कृत्यें करणारा तूंच देव आहेस; तूं आपले सामर्थ्य लोकांत प्रगट केले आहे.''** - म्हणजे सर्व परिस्थितींमध्ये.

अशा अनिश्चित समयात आपल्या प्रत्येकाला, वैयक्तिक रित्या आपल्या कुटुंबांत आणि मंडळीमध्ये देव काय करणार आहे हे जाणून घ्यावयाचे आहे.

इतर कोणत्याहि गोष्टिंपेक्षा मोठा प्रश्न आहे, ''या सर्व परिस्थितींमध्ये देव कोठे आहे?'' हा सारखा उपस्थित होणारा आणि भयानक असा प्रश्न आहे.

बायबल शिकविते की, लोक जेव्हा निराधार अवस्थेत असतात कोठे आणि कसे जावे हे कळत नाहि आणि पुढे भविष्यात काय आहे याविषयी खात्री नसतात अशा समयी तो आश्चर्यकारक गोष्टि करतो. मला माहित नाहि आपल्यापैकी कितीजण अनिश्चित समयातून जात आहेत. माझे जीवन कधीतरी बदलेल कां? तुम्ही आवाहनात्मक समय अनुभवित असताना देखील, देव राजासनावर आहे. तो अद्यापी राज्य करीत आहे. आपल्या जीवनात तो विशिष्ट परिस्थिती येऊ देतो, अशासाठी की आपण त्याजकडे वर दृष्टि लावावी, आणि त्या परिस्थिती द्वारे तो ऊंचाविला जावा.

इस्राएलांच्या जीवना शिवाय दुसरे उदाहरण नाही. गुलामीच्या बंधनातून सुटका व्हावी याकरिता ते ४०० वर्षे प्रार्थना करीत होते. सरते शेवटि देवाने मिसरी लोकांमध्ये अद्भूत कृत्ये करुन त्यांच्या मध्ये त्याचे सामर्थ्य जाहिर केले. मरी, मृत्यु, तांबडा समुद्र दुभागुन त्याच समुद्रात मिसरी सैन्य बुडवून त्यांना किनाऱ्यावर सुखरुप नेले. सर्व दहा पीडा, या मिसऱ्यांना देवाचे सामर्थ्य जाहिर करण्याकरिता होत्या. देवाला त्यांना सहज बाहेर काढू शकणे शक्य होते. त्याला मिसऱ्यांनीच केवळ नाहि तर देवाच्या लोकांनी देखील यहोवा कोण आहे हे कळावे असे वाटत होते. तो कशा प्रकारचा देव आहे! किती सामर्थ्यशाली आहे! आज २०२४ मध्ये सर्व परिक्षांमध्ये उभे राहता यावे यासाठी आपण बोलत आहोत!

## आपण अनिश्चित समय कसे हाताळावे?

अनिश्चित समयाच्या काळात आपल्याला ज्या भावना अनुभविण्यास मिळतात त्या म्हणजे - गोंधळ, शंका, प्रश्नचिन्ह, भीति, अस्वस्थता, प्राप्त परिस्थिबद्दल दुसऱ्यांना दोष देणे, क्रोध, निराशा संताप, कटुता नाऊमेद, विषण्णता, एकटेपण, चिंता, काळजी आणि अशा अनेक भावना! तेव्हा, आपण ''स्तब्ध रहावे'' किंवा संयम पाळावा किंवा दुर्लक्ष करुन काहिंच घडणार नाही असे मानून प्रवाहा बरोबर जावे?

अशा समयांत आपण काय करावे?

### १) देवाला आपले भविष्य ठाऊक असल्यामुळे त्याच्या अभिवचनावर विश्वास ठेवा :-

तुमचे अज्ञान/अनामिक भविष्य ज्या देवाला ज्ञात आहे, त्याच्या हातात द्या.

दुसऱ्या शब्दात, देवाला बिलगून राहा. कोणतीहि गोष्ट सुरुवात करण्याच्या किंवा काही योजना करण्या अगोदर कोणत्याहि

(...पान ६ वर)


# NEHEMIAH BIBLE

**RESIDENTIAL / EVENING COLLEGE,**

Velachery / Chepauk & Santhoshapuram, Chennai.

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

Medium : Hindi / Tamil

*Registered Candidate for Membership*
Asia Theological Association (ATA)
Recognised by International Christian Leaders & Senior Pastors for the past 54 years

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ★ ECHO OF HIS CALL ★ Estd.: 1969

Qualification : 10th Standard & above

Certificate in Ministry
Diploma in Theology
Rush for admission!

Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✶ ONLINE CLASSES ARE AVAILABLE ✶

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ मार्च ते १८ एप्रिल २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ मार्च** : आमच्या **बायबलकोर** आणि पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या **थियॉलॉजीकल अभ्यासक्रम** आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२० मार्च** : आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज** विद्यार्थी आणि मुख्य मंडळीतील तरुणांकरीता महाबळीपूरम येथे २६ जानेवारी रोजी घेण्यात आलेले एक दिवसीय शिबीर आशीर्वादी केल्याबद्दल.

**२१ मार्च** : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबियांना सर्व दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित ठेवल्याबद्दल.

**२२ मार्च** : १९६९ सालापासून आमची मासिक प्रसिद्ध करण्याची जबाबदारी आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

**२३ मार्च** : बहुंविविध सेवांच्या माध्यमांद्वारे आमचे वरिष्ठ पाळक सुवार्ता गाजविण्याची जबाबदारी पार पाडीत आहेत.

**२४ मार्च** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदारांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२५ मार्च** : नविन विश्वासणाऱ्यांना अभिषेकासहित आमच्या मंडळीत आणल्याबद्दल.

**२६ मार्च** : **नहेम्या बायबल कॉलेज** वरील आशीर्वादा बद्दल.

**२७ मार्च** : आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२८ मार्च** : आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर युथ ॲण्ड किडस्** सेवाकार्य वरील आशीर्वादा बद्दल.

**२९ मार्च** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** करिता समर्पित ख्रिस्ती शिक्षक आणि प्रिन्सिपल देवून आशीर्वादीत केल्याबद्दल.

**३० मार्च** : मिशन क्षेत्रात महान अशी जबाबदारी पार पाडीत असलेल्या सेवकांबद्दल.

**३१ मार्च** : आमच्या सर्व राज्य समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबियांवर असलेल्या आशीर्वादा बद्दल.

**०१ एप्रिल** : मागील महिन्यांतील सर्व गरजा पुरविल्याबद्दल.

**०२ एप्रिल** : राजकीय आणि धार्मिक विरोध असताना देखील ख्रिस्ती सेवाकार्यात उत्कर्ष होत असल्याबद्दल.

**०३ एप्रिल** : सर्व प्रकारच्या गोंधळाच्या आणि युद्धाच्या भयग्रस्त स्थितीत सर्व देशांना असलेल्या दैवी सुरक्षितते बद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ एप्रिल** : देवाने आपल्याला या भुतलावर त्याचे राज्य उभारण्यासाठी अधिकाधीक दिव्य दृष्टि द्यावी.

**०५ एप्रिल** : संसर्गजन्य ताप आणि आजारापूासन संरक्षणासाठी.

**०६ एप्रिल** : आमच्या सर्व सेवाकार्याचा सर्व मार्गांनी आणि प्रमाणात विस्तार व्हावा.

**०७ एप्रिल** : जागतिक अध्यक्ष/राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांकरीता.

**०८ एप्रिल** : आधार देणारे जे प्रार्थना द्वारे आणि स्वेच्छादांना द्वारे सेवाकार्याला पाठींबा देत आहेत अशा आमच्या सर्व हितचिंतक आणि मित्रांकरीता.

**०९ एप्रिल** : आमच्या सर्व सहसंपादकां करीता आणि त्यांच्या कुटुंबियां करीता.

**१० एप्रिल** : जगभरातील तरुण वर्गाने आणि लेकरांनी येशू ख्रिस्ताच्या त्यांचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकारावे.

**११ एप्रिल** : सर्व देशांमध्ये एकात्मता असावी आणि त्यांची सर्व प्रकारच्या योजनात प्रगति व्हावी.

**१२ एप्रिल** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदारांवर दया दृष्टी असावी.

**१३ एप्रिल** : KOHAया संगणक पद्धतीत **नहेम्या बायबल कॉलेज** ग्रंथालयातील पुस्तकांची फेर रचना व्हावी.

**१४ एप्रिल** : जगभरातील लोकांच्या गरजां करीता.

**१५ एप्रिल** : सेवाकार्यातील आर्थिक गरजा पुरविल्या जाव्यात.

**१६ एप्रिल** : जगभरातील आर्थिक मंदी संपुष्टात यावी.

**१७ एप्रिल** : पुन: एकवार सर्व लोकांवर देवाने कृपेची दृष्टि करावी.

**१८ एप्रिल** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण व्हावे.

(पान ४ वरुन)

मानवी मार्गदर्शनापेक्षा देवापासून मार्गदर्शन प्राप्त व्हावे यासाठी प्रार्थना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याहि गोष्टीची सुरुवात करण्या अगोदर देवाच्या वचनांतून त्याला पुष्टि असणे गरजेचे आहे.

अनिश्चिततेच्या समयात देवाच्या लोकांनी त्याच्याकडे वळून त्याच्या अभिवचनावर हक्क सांगून त्यावर आशा ठेवावी. आज तुमची आशा कोठे आहे? कोणावर आहे? तुमच्या पगाराच्या धनादेशावर, कामाच्या सुरक्षिततेवर? उद्या जर काम गमावण्याची वेळ आली तरी, *''मला काहि उणे नाहि; माझा देव माझ्या सर्व गरजा पुरविणार देवाचा चांगुलपणा मला तृप्त करील.'' असे जाहिर करु शकाल कां?''*

अनिश्चतेच्या समयात, विश्वसनिय देवाच्या समक्षतेची इच्छा बाळगा, त्याला विचारा, कारण त्याला आपले भविष्य, आपला उद्याचा दिवस आणि गेलेला दिवस ठाऊक आहे. आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवा.

निर्गम ४:२ या वचनात देव मोशेला विचारीत आहे. ''**तुझ्या हाती ते काय आहे?**'' **तो म्हणाला,** ''**काठी आहे.**'' मोशेने त्याच्या हातातील त्याची जुनी काठी देवाच्या हाती देण्याची निवड केली, तेव्हा चमत्कार घडला आणि ती काठी, ''देवाची काठी झाली.'' त्या काठीचे सामर्थ्य पहा जेव्हा तिचे ''देवाची काठी'' असे रुपांतर झाले!

निर्गम १७:९, ''**...मोशानें यहोशवास सांगितले, आपल्यांतले कांही पुरुष निवडून काढ आणि जाऊन अमालेकाशी युद्ध कर; उद्या मी देवाची काठी हाती घेऊन डोंगराच्या माथ्यावर उभा राहीन.**'' देवाच्या काठी द्वारे त्यांना अमलिक्यांशी युद्ध करता आले.

मोशेच्या जीवनाकडे पाहात असताना, आपल्याला पहावयास मिळते, त्याची मिसरात जाण्याची तयारी नव्हती त्यासाठी त्याने अनेक कारणे पुढे केली. अनिश्चित समयाने त्याच्या कुटुंबाच्या कल्याणाबद्दल, त्याच्या गमावलेल्या पुढारपणा संबंधीत, राजपुत्राच्या नात्याने प्राप्त केलेल्या कौशल्य, फारोपुढे बोलण्याचा प्रभाविपणा, आणि त्याच्या स्वत:च्या लोकांना त्याची कदर नव्हती अशा जागी पुन: परतण्याची भिती असे प्रश्न उपस्थित केले.

मोशेने जेव्हा त्यांच्या शंका आणि भीती यांची पर्वा न करता त्याच्या हातात जे होते (काठी) ते स्वाधीन केले तेव्हा ते अलौकीक असे झाले, ज्याचा उपयोग देवाला अद्भूत कृत्ये आणि सामर्थ्य दाखविण्यास करता आला.

आज तुमच्या हातात जे कांही आहे ते देवाला त्याद्वारे अद्भूत कृत्ये करता यावीत याकरिता त्याच्या स्वाधीन करण्यास तयार आहात कां? तुम्ही त्याला तुमची भीती, चिंता, प्रश्न, गोंधळ, शंका, अस्वस्थता वर्तमान परिस्थितीत अस्वस्थता, दुसऱ्यांना दोष देणे, क्रोध, निराशा आणि इतर नकारात्मक गोष्टी द्या.

''त्या देवाची काठी बनू द्या''

## २) स्वत:स देवभक्त लोकांनी घेरुन टाका अशा साठी त्यांना तुमच्या सोबत चालता यावे!

आपल्याला मंडळी, आणि मंडळीतील कुटुंबे असण्याचे हे एक कारण आहे. तुमच्या जीवनात तुम्ही अनिश्चित समयातून जात असताना तुमच्या सोबत देवभक्त असलेल्या लोकांना तुम्हाला बळ देण्यास, तुमच्या सोबत प्रार्थना करण्यास आणि तुमच्या एकाकी मार्गक्रमणात तुम्हाला धीर देण्यास तुमच्या सोबत चालू द्या. अशा स्थितीत असताना आपल्याला अशा लोकांशी नाते संबंध वाढवण्याची गरज आहे, जे आपल्या सोबत राहून प्रार्थना करतील आणि आत्मिक सल्ला/मार्गदर्शन करतील.

नित्यनियमाने ज्यांच्या सोबत तुम्ही प्रार्थना करु शकाल अशा व्यक्तिची निवड करा! अशी व्यक्ति निवडा, जी तिच्या आत्मिक नैपुण्याने/विशेष ज्ञानाने तुम्हाला आशीर्वाद देवू शकेल, किंवा अशी व्यक्ति निवडा जी तुमच्या अनुभवांच्या आणि विशेष ज्ञानाच्या द्वारे आशीर्वादीत होऊ शकेल. तुम्ही जर हे दोन्ही करु शकत असाल तर ते उत्तमच होईल.

दानीएलच्या जीवनात असा एक काळ असू शकतो - एक कुमार अवस्थेत अनिश्चितता, कुटुंबाला, मित्रांना, जन्मस्थळाला, नातेवाईकांना आणि स्वतंत्रता सोडावा लागते, इच्छा नसताना एक गुलाम म्हणून अज्ञात देशात जावे लागणे.

पहिल्या अध्यायात त्याला देवाची मेहरनजर पहावयास मिळते - सर्व कांही ठीक चाललेले असताना दुसऱ्या अध्यायात त्याला अचानक गंभीर अशा पेच प्रसंगाला सामोरे जावे लागते.

राजाला स्वप्ने पडतात ''**जेणेकरुन त्याच्या मनाला तळमळ लागते आणि त्याची झोप उडते.**'' (दानीएल २:१)

वचन १२ :- **राजा क्रोधाने संतप्त होतो, आणि बाबेलच्या सर्व राज्यांचा वध करावा अशी आज्ञा करतो तेव्हा दानिएलाचा व त्याच्या सोबत्याचा**

(...पान ९ वर)


# NEHEMIAH BIBLE COLLEGE

## Graduation Service, 2023-2024

Venue : BKN Hall, Vepery, Chennai – 07.



Date : 1st June, 2024 (Saturday)



Time : 5.00 P.M.

About 50 students will complete their studies and will be sent to the mission field.

We need 75 students for the Tamil and Hindi courses for the academic year 2024-2025. Please pray for this request.

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आज्ञापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## तुझे पाऊल पडेल ते ठिकाण मी तुला देईन

**''ज्या ठिकाणी तुमचे पाऊल पडेल ते ते ठिकाण मी तुम्हांस दिले आहे.'' (यहोशवा १:३)**

ते १९७३ सालातील एप्रिल/मे महिन्यातील उन्हाळ्यातील दिवस होते. चेन्नाईमधील तांब्रम येथील कोरले हायस्कूल मध्ये तरुण-तरुणीं करीता तीन दिवसांचे शिबीर आयोजीत करण्यात आले होते. तरुणांमध्ये संजीवन घडविणारी सहभागीता - 'Blessing Youth Mission' या संस्थेचे संस्थापक बंधु आर. स्टॅंडली, हे शक्तिशाली आणि आवाहनात्मक संदेश देत होते. ते आजपर्यंत ख्रिस्ती सेवेत एक महान असे पुढारी आहेत.

मी देखील त्या सभांमध्ये भाग घेतला. त्यावेळी मी २३ वर्षे वयाचा होता आणि सरकारी कार्यालयात काम करीत असून देवाची सेवा करीत होतो. त्या सभेत मला माझ्या जीवनात आवाहनात्मक अनुभव प्राप्त झाला.

तीन दिवसांचे शिबीर तिसऱ्या दिवसाच्या दुपारच्या भोजनानंतर समाप्त झाले. सर्वजण बस आणि ट्रेननी घरी परतण्याची घाई करीत होते.

परंतु मला पवित्र आत्म्याच्या परिणामामुळे तेथून बाहेर पडता येत नव्हते, मी कोरले हायस्कूलच्या फाटकात जवळ जवळ तासभर उभा होतो. देवाचे सेवक बंधु आर. स्टॅण्डली यांनी उच्चारिलेले प्रत्येक शब्द माझ्या आत्मिक डोळ्यांसमोर येत होते.

पवित्र आत्मा त्याच्या मंद आणि मृदु आवाजात मजशी बोलला त्यामुळे मी माझ्या रहाण्याच्या ठिकाणी जावू शकलो नाही. तर उलट त्या कडक उन्हात तामरम-वेलाचेरी या चेन्नेइच्या मुख्य रस्त्यावरुन चालू लागलो. माझ्या सोबत शिबीरात असलेल्या मुला-मुलींनी मला रस्त्यावरुन चालत असलेले पाहिले, तेव्हां त्यांना वाटले की माझ्याकडे बस किंवा ट्रेनने प्रवास करण्याकरिता पैसे नाहीत. बसच्या खिडकीतून ते मजकडे दु:खीत नजरेने पहात होते.

परंतु मला त्याबद्दल वाईट वाटले नाही. मी रस्त्यावरून चालता चालता समोर येणाऱ्या व्यक्तिंना आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या घरांमध्ये रहाणाऱ्यांना शुभवर्तमान पत्रिका वाटत होतो. त्या दिवशी मी १२ कि.मी. चाललो. मला भूक आणि तहान लागली होती आणि माझ्या सॅन्डलेचा पट्टा तुटला. एक तरुण मुलगा कडक उन्हात एका हातात कांही पुस्तके आणि तुटलेले सॅण्डल घेऊन चालत असलेला पाहून रस्त्याने जाणारे सर्व मजकडे सहानुभुतीने पाहात होते. वेलाचेरीला पोहचलो तेव्हा माझ्याकडील सर्व शुभवर्तमान पत्रिका संपल्या होत्या. आणि त्यावेळी वर्दळ देखील कमी झाली होती.

मन वाटले, स्वर्ग उघडला आहे, आणि त्या स्वर्गातून दोने डोळे इतर असंख्य डोळ्यांसहित मजकडे आणि माझ्या कठीण परिस्थितीकडे पहात आहेत मी शरिराने थकलेला होतो; मात्र आत्म्यात बलवान होतो. मी चेपॉकला माझ्या घरी रात्री पोहचलो.

दिवस सरत गेले. वर्षे देखील सरली मी त्या दिवशी ज्या विभागातून चाललो होतो, देवाने मला त्या विभागातील अनेक आत्मिक असे लोक दिले. त्या मार्गावरील बंधु दुराई आणि त्यांची पत्नी बहिण फेनेला, आणि ॲडव्हेंट मिशनच्या पाळकाबरोबर घनिष्ट नाते जोडले. ज्या रस्त्याने मी चाललो होतो, देवाने मला १९९७ साली एक मंडळी आणि संतोषपुरम येथे इंग्रजी माध्यमाची शाळा (सेंट पॉलस् मॅट्री मॅट्रीक्युलेशन स्कुल) देवून आशीर्वादीत केले. वेलाचेरी येथे ज्या ठीकाणी मी चालताना थांबलो होतो त्या ठीकाणी देवाने मला एक प्रार्थना मंदिर बांधणे आणि निवासी हिन्दी **नहेम्या बायबल कॉलेज** सुरू करणे शक्य होऊ दिले. देव बंधु एडविन नावाच्या व्यक्तिशी ज्यावर मला ती मालमत्ता माझ्या सेवा कार्या करिता दान द्यावी असे बोलला, ज्यामुळे मी प्रार्थना मंदिर आणि **नहेम्या बायबल कॉलेज** साठी ती जागा वापरु शकलो.

या दोन सेवा आता **एको ऑफ हिज कॉल**चे दोन डोळे म्हणून कार्यरत आहेत.

देवाने मला पवित्र आत्म्याच्या प्रेरणेचे आज्ञापालन करण्यास प्रवृत्त केले आणि त्या सर्व कठीण अनुभवांतून जाण्यास मदत केली. मार्ग खडतर होता परंतु शेवट महान विजय होता.

प्रिय बंधुनो आणि बहिणींनो, देव अशाप्रकारे तुमच्याशी बोलताना तुम्ही ऐकले आहे कां? तुम्ही तात्काळ आज्ञापालन केले कां? देवाने दर्शविलेल्या दिशेने तुम्ही कधी तरी काम केले कां? किंवा देवाने दिलेली सेवा करण्या ऐवजी, योना प्रमाणे ज्या सेवने तुम्हाला आनंद मिळतो, समाधान आणि संरक्षण मिळते अशी दूसरी सेवा करीत आहात? जे स्वत:च्या सोईप्रमाणे सेवा करतात आणि ती देवाची सेवा आहे असे समजतात, अशा अनेक लोकापैकी तुम्ही आहात कां?

ज्या देवाने यहोशवाला त्याचे पाय ज्या भूमिला लगतील ती त्याला व त्याच्या वंशजाचे निरंतरचे वतन होईल असे अभिवचन दिले होते (यहोशवा १४:९) तो तेच तुमच्या बाबतीत देखील करणार ज्याने तुम्हाला पाचारण केले तो विश्वसनिय आहे!

त्याची आज्ञा पाळा आणि त्याची इच्छेप्रमाणे करा. या जीवंत देवाला जगामध्ये घेऊन जाण्यास पुढे व्हा. निशितच त्यामध्ये विजय आहे !

(पान ६ वरुन)

**वध करावा म्हणून लोक त्यास शोधू लागतात.** सर्व काही सुरळीत चाललेले असताना, अचानक त्याला त्याचे काम, प्रसिध्दि, जबाबदारी आणि सर्वावरची मान्यता गमवावी लागणार होती. आता पर्यंत केलेले परिश्रम व्यर्थ जाणार होते.

त्याने काय केले? दानीएल अनिश्चिततेच्या अतिशय निराशजनक अशा वेळेत होता. वचन १७ आणि १८ - **त्याने त्याच्या सोबत्यांना हकीकत कळविली, आणि त्यांनी प्रार्थना केली. त्याने तात्काळ स्वत:स त्याच्या सम विश्वासातील लोकांच्या स्वाधीन केले जे त्याज बरोबर चालू शकले आणि तो कोणत्या स्थितीत आहे हे समजू शकले.** त्यांनी प्रार्थना केली, आणि काय घडले ते आपल्याला ठाऊक आहे. देवाने त्यांना भविष्या विषयीची योजना प्रगट केली.

आपला देव महान आहे. तेव्हा देवभक्त अशा लोकांच्या सहवासात रहा.

**३) शांत व्हा आणि लक्षांत ठेवा की मीच देव आहे!**
**स्तोत्र ४६:१०**

अनिश्चिततेची भावना पुढील मेंदुचा बाह्यपटल 'कायमचा बंद' होऊन समस्या सोडविण्याची क्षमता, लक्ष केंद्रीत करणे आणि लवचिकता दुर्बल होण्यात होऊ शकते. पुढे ती असंमजसपणाच्या स्वभावात गुंजण्यात शक्यता आहे आणि तुम्ही अधीक अस्वस्थ, निराश आणि तणावग्रस्त करते.

यामुळेच तुमचे हृदय देवाच्या सत्यांवर एकाग्र केल्यामुळे जे घडते त्यावर तुमचे मन केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.

शांतता/स्तब्धता हि शिस्त आहे जी सतत जाणीवपूर्वक सरावाने होते.

शांततेची कृतिने आपले ज्ञानेंद्रिये तीक्ष्ण बनतात आणि आपल्याला वर्तमान अनिश्चिततेच्या परिस्थितीत देवाच्या समक्षततेची जाणीव करुन देते.

जेव्हा केव्हा आपण गोंधळलेले असतो तेव्हा आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्ता जो परमेश्वर तो सर्व पृथ्वी हालवितो आणि समुद्र उचंबळवीतो. जो द्वार उघडतो आणि बंद करीतो त्याजकडे वर पहावे.

देवाच्या समक्षतेत शांत रहाणे, म्हणजे त्याच्या समोर जाऊन काही न बोलता बसणे. त्याला कांहि सांगू नका, तुमच्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा जो त्याज पासून कांही ऐकू येत नाही. तो पर्यंत वाट पहा. **देवाचे युद्ध हे तुमचे युद्ध करण्याचा प्रयत्न करु नका.**

तुम्ही देवाच्या सानिध्यात जाता :-

१) तुमच्या मर्यादेची जाणीव असू द्या - भावनेला नाव द्या.

२) तुमच्याकडे आहे ते देवाला द्या-ती काठी आणि ती देवाची काठी/देवाची समस्या त्याला हाताळू देण्यासाठी.

३) देवाची अभिवचने कबूल करण्यास सुरुवात करा-कबूल करण्यासाठी ती पाठ करण्याची गरज आहे.

४) "**परमेश्वर तुम्हांसाठी लढेल, तुम्ही उभे राहा.**" (निर्गम १४:१४)

प्रिय मित्रांनो,

देवाला मागा, की त्याने तुम्हाला तुमच्या सोबत चालू शकतील असे भरोशाचे लोक दाखवावेत. देवाने तुम्हाला त्याच्या समक्षतेत शांत राहून त्याजपासून शिकण्याचे शिकवावे असे त्याला मागा.

यशया ३०:१५, "**...मागे फिरणे व स्वस्थ राहणे यांत तुमचा बचाव आहे; शांतता व श्रद्धा यांत तुमचे सामर्थ्य आहे**". लक्षात असू द्या; काहीही घडेल आणि परिस्थिती कितीही अंधूक असेल, सर्वसामर्थी देवावर भरोसा ठेवा. तो तुमचे सर्व वाकडे मार्ग सरळ करील कारण **तो अद्भूत कृत्ये करणारा देव आहे.** (स्तोत्र ७७:१४)


# URGENT

We require approximately 1000 Hindi Christian books for **our Nehemiah Bible Colleges**. Kindly inform us about the possibility of obtaining theological Hindi books.

**Please stop sending books in English and Tamil languages.** Thank you.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

# URGENT NEED

**PRINCIPAL & TEACHERS**
**for**

**ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL,**
**An *Echo of His Call* Institution**
**Vijayanagaram, Medavakkam, Chennai - 100.**

We need well qualified, experienced, dedicated, hard working and mission oriented Christians.

Apply with Bio-data to
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

# WANTED for

**NEHEMIAH BIBLE COLLEGE of ECHO OF HIS CALL, Chennai**
(ATA - Registered Candidate for Membership)

**DEAN (Residential):**
Hindi Theologian with M.Div. / M.Th. Degree & experience. Boarding, Lodging and Salary will be paid.
Eligible candidates may send bio--data to:
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |
| SWIFT CODE | : | **SBI NIN BB 455** |

***2. Bank : ICICI Bank***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th MARCH 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**